## होळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

पुढील आठवड्यात येणारा होळी आणि रंगोत्सव आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंदाची उधळण करो.





# PTVA Schools दर्पण

For private circulation only

VOLUME: 01 | ISSUE:02 | 8 PAGES | February 2023


जे, जसे आहे ते नि:पक्षपातीपणे समोर आणणारा आरसा म्हणजेच 'दर्पण'!
पार्ले टिळक विद्यालयाच्या शाळाजगतातील नित्य नव्या घडामोडी वाचकांसमोर आणणारा नितळ, सुंदर आरसा म्हणजेच आपले 'PTVA Schools दर्पण'.

The chosen name PTVA Schools दर्पण is suggested by PTV Marathi Secondary and PTVA's Eng Medium school Andheri.

## संपादकीय Editorial

### अस्मदीय !



जान्हवी खांडेकर
मुख्य समन्वयक
पाटिविअ

It is very well said, **"when you tell me I forget, when you teach me I may remember but when you involve me I learn".**

PTVA Newsletter is our effort not merely to connect but to involve everyone related in any way, in any capacity, to any Parle Tilak Vidyalaya Association school. Every month we will meet on this platform to share the events and programs organized from the 15th of the earlier month to the 15th of the current month. Here the students will write reports, articles, book reviews, etc. They will interview distinguished alumni of their schools. And above all, they will read and appreciate the writing of students of other PTVA schools. In this age of collaboration, let's work together, let's grow together!

परस्पर सहकार्य आणि सामंजस्य हे आजच्या युगाचे ब्रीद आहे. आपल्या संस्थेच्या सर्व शाळांमध्ये सर्वगुण संपन्न असे अनेक विद्यार्थी आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे तेवढेच सक्षम शिक्षक आहेत. आजवर या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून पार्ले टिळक विद्यालय संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवला. शंभर वर्षांचा हा देदीप्यमान वारसा आपल्या सर्वांना पुढे न्यायचा आहे. PTVA Newsletter च्या माध्यमातून सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना एकमेकांकडून स्फूर्ती घेण्याची, नवीन काही शिकण्याची संधी मिळणार आहे. 'मी' कडून 'आम्ही' कडे सुरु झालेला हा आपला प्रवास सर्वांसाठी उत्कर्षदायी ठरो हीच शुभेच्छा !

# 'पार्ले टिळक'च्या शिरपेचात मानाचा तुरा!

## कमोडोर प्रशांत सिधये आणि कर्नल संदीप पेंडसे विशिष्ट सेवा पदकाने सन्मानित

**प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी भारतीय सैन्य दलातील अतुलनीय योगदानाबद्दल विशिष्ट सेवा पदक VSM दिले जाते. यावर्षी प्रथमच एकाचवेळी पाटिविअच्या दोन माजी विद्यार्थांना हा बहुमान प्राप्त झाला आहे.**



भारतीय सैन्य दलातील अतुलनीय योगदानाबद्दलचे विशिष्ट सेवा पदक यावर्षी कमोडोर प्रशांत दत्तात्रय सिधये यांना जाहीर झाले. पार्ले टिळक विद्यालय 1986 Matriculation Batch चे हुशार विद्यार्थी असलेले कमोडोर प्रशांत सिधये सध्या हेड ऑफ नेवल कंपोनंट ऑफ अंदमान अँड निकोबार Command, Naval Officer in Charge, अंदमान अँड निकोबार आणि Flotilla Commodore ह्या महत्त्वाच्या उच्चपदावर कार्यरत आहेत.

तर सशस्त्र दल विभागातील 'Distinguished service of a High order' यासाठी कर्नल संदीप पेंडसे यांना गौरवण्यात येणार आहे.

राष्ट्रपतींच्या हस्ते विशेष कार्यक्रमात हे विशिष्ट सेवा पदक प्रदान करण्यात येते.

शाळेच्या दोन्ही माजी विद्यार्थ्यांनी केलेली ही अतुलनीय कामगिरी शाळेसाठी अत्यंत अभिमानास्पद असून पार्ले टिळक असोसिएशन परिवारातर्फे कमोडोर प्रशांत सिधये आणि कर्नल संदीप पेंडसे यांचे कौतुक आणि अभिनंदन करण्यात आले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

(सविस्तर वृत्त पान ६)

## भावपूर्ण श्रध्दांजली



पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती शुभा दिगंबर नाईक यांचे १३ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले.

श्रीमती शुभा नाईक पार्ले टिळक विद्यालयाच्याच माजी विद्यार्थिनी होत्या. त्या एक उत्तम खेळाडू होत्या. प्राथमिक शाळेत त्यांची नेमणूक १३ जून १९६० रोजी सहाय्यक शिक्षिका म्हणून झाली. शिक्षिका असताना चौथीसाठी त्या मराठी स्कॉलरशिप वर्ग घेत होत्या. त्यांनी अनेक उत्कृष्ट नाटकं बसवली. सर्वच नाटकांना अफाट यश मिळाले. १ जुलै १९९३ पासून त्यांची मुख्याध्यापक पदावर नेमणूक झाली. ३१ मार्च १९९४ रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या. अतिशय अभ्यासू आणि प्रतिभासंपन्न असा नावलौकिक मिळवलेल्या नाईकबाईंना पार्ले टिळक विद्यालय परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. प्रसिद्ध अभिनेत्री अतीषा नाईक ही बाईंची कन्या देखील पार्ले टिळक विद्यालयाची माजी विद्यार्थिनी आहे.

# PTVA launched its own joint newsletter of all PTVA Schools.









In their endeavour for all round development of students, PTVA, launched a monthly newsletter which will encourage children to read and write apart from their usual syllabus. The monthly tabloid is a novel concept perhaps first of its kind in Mumbai which will cover the events of the PTVA schools, thoughts penned by teachers and contributions from students too. The PTVA Schools monthly newsletter was launched on Republic Day 26th Jan 23 in all the schools of PTVA at the same time. The office bearers of PTVA Anil Ganu, Vinay Jog, Bansi Dhurandhar, Dilip Pethe, Hemant Bhatwadekar and Dhananjay Sathaye released the first issue. Principals of all schools had made creative arrangements for this important event. Editor of Thane vaibhav Milind Ballal, Managing editor Nikhil Ballal and associate editor Juili Kulkarni graced the function. Thane Vaibhav team will handle designing and printing while PTVA's chief coordinator Janhavi Khandekar will be the editor of the monthly newsletter. students and parents have appreciated the initiative. We would be updated with all the events and activities on a regular basis, said a parent. Students have thanked their school for providing such a platform to explore their creativity.



# SEE WHAT MY MIND'S EYESHOTOUTFORYOU!

## Students participate in an innovative photography event




The students of Parle Tilak Vidyalaya (ICSE), Primary Section, participated in an innovative Photography Activity at school on February 9th, 2023. Each grade was given a different topic and students participated in huge numbers with enthusiasm.

Students of Grade one brought pictures of one living thing and one non-living thing. They spoke confidently about when, where and why they chose the particular subject for their photography activity. At the end of the activity they were able to state the differences between living and non-living things. Students of Grade two photographed three flowers each and shared with their classmates the names of these flowers in different languages like Hindi, English, Marathi, Gujarati, German, Spanish, Japanese, etc. A few students also highlighted the reason for the nomenclature of flowers.

Students of Grade three photographed objects at different times during the day. They understood the significance of light in photography. They also observed and discussed shadow formation with their classmates. Grade four students composed their own poems, stories and paragraphs summarising the subject of their photography activity. This activity showcased their imagination and turned out to be a fun one!

Students of Grade 5 selected pictures from their favourite memories- be it a vacation, a favourite corner of their home, an activity that they enjoyed doing, etc. Students shared these pictures in the form of a postcard with their parents, teachers, friends and other family members.






The students of Grade 5 (Batch 2022-23) celebrated their Graduation Day on Friday, 10th February. They were excited to start their new innings.

## Thank you PTVA !



"I am happy that my school started such initiative. All the achievements and activities of students would now be displayed on a regular basis in this newsletter. This will motivate the students and encourage them to work harder. This initiative will help us explore our creativity as well as to read and write more such creative content.

- Sanvi Pathak, Grade 5
PTV, ICSE

## Career Path!

The Indian Certificate of Secondary Education provides a plethora of subjects in grade 9 for the students to enable them to have the right career options after grade 10. In order to give an insight into different career options, the students of grade 8 from ParleTilakVidyalaya (ICSE) attended a workshop on career guidance conducted by YoungBuzz on 30th January 2023. Ms.Nazia Khan, the guest speaker from Young Buzz, delivered the lecture.




## STROKES AND STRIDES AHEAD (IN EXAMS FIRST!)

Our budding cartoonist, Master Anay Limaye, of Grade 5, has a fun comic strip, apt for the pre-exam mood!




Republic Day was celebrated with great patriotic fervour and pomp. Early in the morning the school was seen buzzing with floral decorations around the flag post. The entire program was presented in the form of colloquies by Grade 5 students which included items like Fancy Dress, Medley of Patriotic Songs, a Speech and a Dance.



PICNIC: A day to wish, escape, care and have fun with teachers and friends. Students of Grades IV and V visited Tiku-Ji-N-Wadi on 2nd February, 2023. They had a fun and frolic at this adventurous venue.

# Students excel at Ramakrishna Mission Multi-Talent Competitions



Students of the Primary and Secondary Sections of ParleTilakVidyalaya (ICSE) participated in the 'Vivekotsav', a Multi-Talent Competition to spread Swami Vivekananda's inspiring messages to inculcate the spirit of Swamiji in young minds.

The students participated in Devotional Songs, Drawing, Yoga, & Power-Point Presentations in the month of December 2022. At the prize distribution ceremony held on 12th February 2023 at Ramkrishna Math, Khar. Miss Sharanya Sakhardande from grade 5 won the second position and Miss Urvi Oak from grade 6 won the third position for Devotional Song under Junior Girls Category. Miss Jasvi Parikh from grade 8 won the third position for Drawing under Senior Girls Category.

## Rising Stars!



The students of ParleTilakVidyalaya (ICSE) participated in the Late Shri V.V Bhat Memorial 13th Inter School Volleyball Tournament held at Children's Academy, Thakur Complex, on 29th January 2023. Among 23 schools and 71 teams from Mumbai and Pune, our U/12 Girls' team won third place, U/14 Girls' team won second place and U/12 Boys' team won third place.

## Word Masters!



In the time and age of auto-correct, predictive text, and spell check, students of grades 6 and 7 of Parle Tilak Vidyalaya (ICSE) participated in the Spell Bee Competition on 13th February 2023. The main aim of the competition was to enhance the spelling and literary skills of children by encouraging them to explore the English language, expand their vocabulary and improve their communication and comprehension skills. The competition helped the children to familiarize themselves with the spellings and usage of many unfamiliar words. Master Nishad Bhatawadekar and Master Sohum Khadye from grade 7 won the first prize and second prize respectively. Miss Nyssa Dharwadkar and Miss Trivikram Ranade from grade 6 won the third prize.



## Wheels on the legs!

At the DSO Mumbai Suburban Roller Skating Competition 2023 held at Ameya Classic Club, Virar on 25th January 2023, Urvi Patil from grade 6 of Parle Tilak Vidyalaya (ICSE) secured third place in the 1000 Rink race.

## Thank you PTVA !



"The newsletter is a colourful presentation of the activities conducted by all the schools under the PTVA umbrella. Photos of the grand space exhibition& various awards received by the schools and students, festivals celebrated etc are all covered well in the newsletter. Most importantly, I liked how PTVA is taking efforts to implement the NEP in the pupils through experiential learning.

**- Miss Nabha Khanvilkar (5/B)**
**PTVA's English Medium School, Andheri**

## Coping with Stress



Stress Management is about making a plan to be able to cope effectively with daily pressures. As the students of grade 10 of Parle Tilak Vidyalaya (ICSE) prepare for their board exams, the school made an effort to enable the students to deal with daily stress and help them balance their physical and mental health. A workshop on Stress Management was held on 24th January 2023 for the students and parents of grade 10 where a few secrets to release pressure was shared by the guest speaker Mrs. Mugdha Wagh Shaan, who is an Occupational Therapist.

## The Three C's!



The Three C's (Confidence, Creativity and Communication Skills) was what the students displayed with élan. Wonderful speeches, fascinating presentations, readings, recitals and some wonderful acting were showcased by the students of grades 6,7 and 8 of Parle Tilak Vidyalaya (ICSE) through speech and drama - a year-long language enhancement program in liaison with The Academy for Creative Expression (ACE). The students participated in an Informal Performance Day on the 10th and 14th of February 2023, organized by ACE. The students demonstrated their skills through mime, improvisation, pronunciation, recitation and conversation. The parents were enthralled at the performance and proud to see the change in their wards.




The theme of this year's Republic Day of ICSE secondary was "Nari Shakti or Women Empowerment." Grade 7 and 8 performed a wonderful dance which highlighted the theme of Nari Shakti and displayed the progress made by our country in different fields.

# Students express their gratitude on Grandparents Day






Shivering hands,
Yet the grip so tight.
Over pouring love,
With smiles so bright.
Guiding us through out,
With all their might.
Their hugs so warm,
That calm and soothe us at night.
For us they're our GRANDPARENTS
For them we're their 'world'

To show granparents how thankful their grandchildren are, PTVEMS Primary Section decided to celebrate 'Grandparents' Day' on 10th February '23. The trail of events began with our head mistress Kalpana Kalekar addressing the grandparents followed by a welcome song sung by our music teacher Mrs. Monali Ambekar and accompanied on tabla by Miss Devangi Wadke.

The programme 'Bachpan se Pachpan' and quiz based on old classic songs was another fun filled item conducted by teacher Kamakshi Kulkarni. Now it was time to revive the spirit of excitement amongst our grandparents and so brain gym exercises and quiz based on Mahabharata and Ramayana was conducted by one of our enthusiastic PTA member Mrs. Amruta Lovekar.

A short film 'what is that'? depicting the relationship between a father and son was shown to both our students and their grandparents. The programme concluded with thedistribution of gifts to the winners of the quiz. Snacks along with tea were served to all. After the programme the Grandparents enjoyed taking selfies at the selfie point.




# StudentsbecameSanta

## to spread the message 'Sharing is Caring'!

PTV English Medium School Primary Section's each child wore the Hat of a Santa Claus along with the NGO 'R Society R Responsibility' and brought smiles to many children from other schools. Through gifts they passed on a strong message - Sharing is Caring.

Team 'R Society R Responsibility' has ensured that there are no boundaries. In Joy of Gifting initiative conducted by school, children brought books, stationary, toys and clothes which were gifted to schools at Palghar and other schools in Mumbai who were in need of educational and creative learning's.

The gifts were collected by the NGO 'R Society R Responsibility' and distributed on behalf of our children. The gifts brought smiles to many unknown children and as return gift students received Thank You cards and saplings.

# Shaurya won Gold, Silver and Bronze

PTV English primary section performed well at Brihan Mumbai Jilha Gymnastics Sanghtana Affiliated to Maharashtra Amateur Gymnastics Association had Organised 49 Artistic Gymnastics District Gymnastics Championship - 2022-23 on 11th February 2023 at Lokmany Seva Sangh (Tilak Mandir). In Boys Under 10 category Shaurya Lad (4B) won Silver Medal in Floor Exercise, Bronze Medal in Vault, Gold Medal In All Rounder Champion and clinched 2nd Prize in overall championship.



# Discipline lessons imparted at 'PaalakShaala'



To address the discipline issues with the students at school as home a novel initiative Paalak Shaala was conducted by the school. It was mainly for the primary section from standard 1 to 4. School counsellor Ms. Meghana Barve and the Occupational Therapist Mrs. Mugdha Wagh Shaan led the initiative.

The topic was - ' Discipline issues with the students in school and at home'. Different parameters of discipline were discussed along with the expectations of the parents from the school and vice versa. Star reward system was introduced by the school counsellor and was explained in detail.

Suggestions and feedbacks from the parents were welcomed and all the doubts were nswered.

# Anoushka Patil topped Mumbai Gymnastics all round ranking



PTVEMS student Anoushka Patil has made her school proud. She has topped the Mumbai Gymnastics all round ranking by her recent spectacular performances.

In the District Artistic Gymnastic Championship conducted by the Brihan mumbai Jilha Gymnastic Sanghatana on 12th February, 2023, PTVEMS student Anoushka Patil from IX C won a Gold medal in Vault, Uneven Bar, Balancing Beam and Floor Exercise events. This has made her secure first rank in Mumbai Gymnastics all round ranking. She also participated in the MSSA Gymnastics Competition conducted on 11th February, 2023 at Wadala BPCA College where she won 3 Silver Medals in Vault, Balancing Beam and Floor Exercises.




Like every year this year too PTVEMS Primary section celebrated Republic day with great vigour. The program began with unfurling our national flag, paying salutations to it followed by the national Anthem and an elocution competition was conducted where students delivered great speeches.

# Students shine at The 46th National Arm sport

Students shine at Arm sport Championship and Gymnastic championship (Photo caption)

Championship Organised by the Arm sport Federation India & Conducted by Maharashtra Arm sport Association was held on 5th February, 2023 at Prabhodhankar Thackarey Vile Parle, Mumbai.

Master Sharvil Salvi (3B) bagged two gold medals whereas Miss Arya Gawade (3B) Miss Manasvi Kumbhar (4D), Miss Durwa Patil (3D), Miss Anvai Pednekar (3D), Master Vihan Sawant (1C), Master, Tanmay Gupta (2D), Master Advik Rawle (4C), Miss Siddhi Walapkar (4A) bagged one gold medal each.

Apart from this six students won two silver medals each and seven students won one silver medal each in this event.

# Book Review




The Chosen One,The Path of Secrets is a fictional adventure storybook written by young writer Yash Redkar, a student of Parle Tilak Vidyalaya ICSE School.

We may have read many adventure stories before, but in this book, the author displays freshness in the plot, apart from clarity and ease in its narration. The story is written in a unique style, which is at once powerful and immersive.The story is about a breath-taking adventure which is full of suspense. The book talks about an adventurer Eddie, the hero of this story and his friend Buzz. Eddie is the Chosen One.

While Eddie is a character who is loved for his optimistic attitude, calm nature and bravery, Buzz is a careless and talkative fellow, who sometimes proves to be a life saver for the team. Buzz is the character who ushers in humour into the plot. In this story, both Eddie and Buzz are accompanied by Morris Black and his wife Diana Wayne who are the leaders of the city of Bercreon, on the planet Torranus which is in the center of the universe.

The story focuses on 'The Path of Secrets' which is a magical path built by Titan and his good friend Serachist. The path consists of deadly and the darkest monsters in the entire universe. These monsters give our hero a rather strong fight but with the help of his friends, past experiences and vision Eddie is able to defeat them.



Titan was rising in power due to the Chaos (Darkest power in the entire universe) and it is up to Eddie and Buzz to stop him.

For accomplishing this mission, they have to find The Sapphire of Eternity and venture out onto the Path of Secrets. The Sapphire of Eternity has to be used to restore peace on the planet of Torranus.

What were the sacrifices made by them for achieving their goal?

Did Eddie and Buzz defeat the Titan and bring back peace on Torranus?

Find out the answers to these questions in this amazing book.

A joy to read, this book is strongly recommended.

| | |
|---|---|
| Name of book | The Chosen One, The Path of Secrets |
| Nature of book | Fiction |
| Author | Yash Redkar |
| Publisher | Story Mirror Infotech Pvt Ltd |
| No. Pages | 125 |
| Price of the book | Rs. 199 |



**Book reviewed by Sameer Vaze, Class: IX- A, Parle Tilak Vidyalaya English Medium School.**

## Thank you PTVA !



Reading about the achievements of the students from different schools under our management in various fields - curricular and co-curricular - has been truly inspirational. Delighted to know that the PTVA's Newsletter is a monthly periodical so it will help us stay updated constantly. I am now eagerly waiting for the next edition.

- Avani Walke
from IX C- Parle TilakVidyalaya English Medium School (Secondary Section)

## Siya Deorukhkar and Ananya Tirlotkar blazed the pool



Siya and Ananya bagged silver and bronze medals respectively at State Level Swimming Competitions organsied by Krida and Yuvak Seva Sanchalanalay, Maharashtra and Jilha Krida Adhikari, Pune between 2nd February, 2023 to 5th February, 2023 at Balewadi, Pune.

Siya won Silver Medal in 50 meters Breast Stroke and 100 meters Breast Stroke whereas Ananya Tirlotkar won a Bronze Medal in the Diving Competition.

Students of Parle Tilak VidyalayaEnglish Medium School (Secondary Section) are consistently excelling in their chosen sport and raising the bar of their performance each time. These laurels are making the school proud.

# PTVEMS bagged prizes for wall painting

Two teams of Parle Tilak Vidyalaya English Medium School (Secondary Section) bagged the I prize as well as the II Prize for wall painting in 'Hunar' - A College Festival organized by N.S.S. unit of M. L. Dahanukar College of Commerce. The theme for the first prize winning team was 'Environment conservation' and it comprised of students Durvang Balgude (8D), Preyrit Maurya (8D) and Ojas Desai (8C).

The theme for the second prize winning team was 'Mental Health Awareness' which comprised of students Arya Kolekar (8B), Shriya Sardesai (8D) and Ishwari Vaidya (8D) The students were guided by their Art Teacher Ms. Beena Godambe.




## 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उत्साहात साजरा



'पार्ले टिळक विद्यालय इंग्लिश मिडीयम स्कूल' येथे दि. १४ जानेवारी ते दि. २८ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पाचवी -शुद्धलेखन, इयत्ता सहावी - कथाकथन, इयत्ता सातवी - शब्दकोडी सोडवणे, इयत्ता आठवी - हस्ताक्षर स्पर्धा, इयत्ता नववी - घोषवाक्य / चारोळी / काव्यलेखन असे विविध उपक्रम या पंधरवड्यात विद्यालयात राबवले गेले. सगळ्याच उपक्रमांमध्ये विद्यार्थी आणि मराठी विषय शिक्षकांचा दांडगा उत्साह दिसून आला. दि. २७ जानेवारी रोजी शाळेच्या मराठी वाङ्मयमंडळातर्फे इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी' कविता अभिवाचन स्पर्धा' आयोजित करण्यात आली. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या अभिवाचन स्पर्धेसाठी' मराठी साहित्यातील देशभक्ति पर कविता' असा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. 'योग्य ती कविता निवडून तिचे अभिवाचन कसे करावे' या बाबत शाळेच्या मराठी विषय शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले.



अभिवाचनासाठी कविता निवडण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाचनालयातील कविता संग्रह घेतले, त्यातून कविता शोधल्या आणि त्या कविता स्पर्धेत उत्कृष्ट प्रकारे सादर केल्या.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात विद्यालयात राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांना विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद लाभला. एकूणच मराठी भाषा संवर्धनाच्या दृष्टीने टाकलेले हे आश्वासक पाऊल हे उपक्रमाचे उद्दिष्ट सफल करणारे ठरले!



On the eve of Republic day, the students of Class IX of PTVA English medium secondary made a pretty picture. Their heads held high, with love for motherland in every heart, they marched with elan. Their uniform movement with a steady gait in a rhythmic manner was applauded by all.

# बहुआयामी व्यक्तिमत्व : कमोडोर प्रशांत सिधये

कमोडोर प्रशांत दत्तात्रय सिधये यांना राष्ट्रपतींच्या विशिष्ट सेवा पदकाने नुकतेच गौरविण्यात आले. भारतीय सैन्य दलातील अतुलनीय योगदानाबद्दल विशिष्ट सेवा पदक दिले जाते, ते यावर्षी कमोडोर प्रशांत सिधये यांना देण्यात आले. पार्ले टिळकचा माजी विद्यार्थी म्हणून संस्थेला त्यांचा खूप खूप अभिमान वाटतो.

प्रशांत सिधये पार्ले टिळक विद्यालय 1986 Matriculation Batch चे हुशार विद्यार्थी. खेळाच्या मैदानावर अधिक रमणारे, क्रिकेट, फुटबॉल खेळाडू म्हणून सुपरिचित होते. प्रशांत यांनी वेगळे काहीतरी करावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. त्यामुळे वडिलांनी सर्विसेस प्रिपेटरी इन्स्टिट्यूटची (SPI) जाहिरात पाहून अर्ज केला. ८०० मुलांमधून प्रशांत यांचा प्रथम क्रमांक आला आणि मग NDA चा प्रवेश सोपा झाला. प्रशांत यांनी इंडियन नेव्हीमध्ये करिअर करण्याचे ठरवले. आत्तापर्यंत 30 हून अधिक देशाच्या नेव्ही बरोबर त्यांनी Naval Operations आणि Exercises केले आहेत.

त्यांनी विविध प्रकारच्या युद्ध युद्धनौकांवर काम केले. INS कारवार, खंजर, कोरा आणि ब्रह्मपुत्र या युद्धनौकांचे ते Commanding Officer कॅप्टनही होते. तसेच त्यांनी आत्तापर्यंत डायरेक्टर ऑफ नेव्हल ऑपरेशन्स, Eastern Fleet Headquarters आणि Director of Operational


प्रशांत सिधये

Evaluation Group अशा विविध क्षेत्रात महत्त्वाच्या भूमिका निभावल्या आहेत.

त्यांनी National Defence Academy, Khadakwasla, Defence Services Staff College, Wellington, Anti Submarine Warfare School, Kochi आणि College of Defence Management, Secunderabad या महत्त्वाच्या संस्थांमध्ये Training, Teaching and Mentoring Faculty मध्ये शेकडो भारतीय आणि परदेशी ऑफिसरांचे प्रशिक्षण केले आहे. त्यांनी वेगवेगळ्या कमी जास्त कालावधीचे नौदल अधिकारी यांच्यासाठी पंधरा प्रकारचे कोर्सेस डिझाईन केले आहेत.

नौदलाचा अभ्यास, सराव प्रशिक्षणाबरोबर त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची बीए पदवी, PGDPM पुणे विद्यापीठ, एम फिल (Defence and Strategic Studies) मद्रास विद्यापीठ, मास्टर्स इन मॅनेजमेंट स्टडीज, उस्मानिया विद्यापीठ, एम.फिल Business management आणि Masters in Social Development (ढाका विद्यापीठ) असा प्रदीर्घ काळ अभ्यास केला.

त्यांनी विविध विषयांवरील बारा रिसर्च पेपर्स सादर केले. Arab Israel, Yom Kippur War या प्रोजेक्ट स्टडीला गोल्ड मेडल, Need for Equal Impetus to Ship Repair Industry with Ship Building in India या सादरीकरणाला Best Dissertation ट्रॉफी, Modernisation of Chinese Navy and its Implications for India till 2050 या अभ्यासाअंतर्गत रिसर्चला बेस्ट इंडिव्हिज्युअल रिसर्च ट्रॉफी आणि याशिवाय अनेक प्रोफेशनल कोर्सेसमध्ये बक्षिसे मिळवली आहेत. अनेक प्रकारचे सन्मानही मिळालेले आहेत.

सध्या ते हेड ऑफ नेवल कंपोनंट ऑफ अंदमान अँड निकोबार Command, Naval Officer in Charge,अंदमान अँड निकोबार आणि Flotilla Commodore या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या आमच्या विद्यार्थ्यांचा आम्हाला खूप खूप अभिमान आहे.

# क्षण निरोपाचा...





"घेतो निरोप आता, जातो अमुच्या गावा, मनात साठवून अलगद, आठवणींचा गोड ठेवा" असे म्हणत शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. परांजपे विद्यालयाच्या सभागृहात शुक्रवार 10 फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने शिक्षक कमलेश गोरुले यांनी सुंदर हस्ताक्षरात फलक सुशोभित केला होता.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. हाक्के आणि प्राथमिक विभागाच्या वरिष्ठ शिक्षिका प्रियंका बर्वे उपस्थित होत्या. श्रीम. नागवेकर बाईंनी या निरोप समारंभाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी स्वीकारली आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री हाक्के यांनी स्वतःचे आवडीचे क्षेत्र निवडा व मिळालेल्या संधीचे सोने करा. स्वतःची स्वप्ने साकार करताना त्यांना प्रयत्नांची जोड द्या असे बहुमोल मार्गदर्शन केले. श्रीम. बर्वे यांनी कृतीवर भर द्या असे विचार मांडत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेतील सर्व शिक्षकांच्या वतीने श्रीम. नाईस्कर यांनी जीवनात योग्य वेळी योग्य कृती करा. स्वयंशिस्त बाळगा व ध्येयाच्या अनुषंगाने प्रयत्न करा, यश आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही, असे विद्यार्थ्यांना सांगितले. श्री. साळवे यांनीही मनोगत व्यक्त केले. परीक्षेत अव्वल क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक श्री. हाक्के सरांच्या हस्ते करण्यात आला.






पार्ले टिळक विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ म्हणजे शाळा माऊलीसाठी व सर्व शिक्षकांसाठी खरंतर कर्तव्यपूर्तीचा दिवस असेच म्हणावे लागेल. पाचव्या -सहाव्या वर्षी गांगरलेल्या अवस्थेत शाळेत आलेली ही चिमणी-पाखरं आज दहा वर्षांनी पंखात ज्ञानाचे, संस्कारांचे बळ घेऊन बाहेरील विशाल जगात झेपावण्यास सज्ज झाली आहेत त्यानिमित्त हा आनंद सोहळा शाळेने ११ फेब्रुवारी रोजी शाळेत आयोजित केला होता.

# Thank you PTVA !



“ २६ जानेवारी २०२३ रोजी पार्ले टिळक असोसिएशननेसुरू केलेले “न्यूज लेटर” हे वृत्तपत्र ज्या क्षणी हातात पडले तेव्हा पाहता क्षणी मन हरखूनगेले. यात आपल्या संस्थेच्या शाळेतील किती नवीन-नवीन गोष्टी आहेत हे कळले. केंद्रीय मंत्री डॉक्टरसुभाष सरकार यांच्यासोबत साजरा केलेला बालदिन, माझ्या शाळेतल्या मित्र-मैत्रिणींनीविविध स्पर्धेत केलेली प्रगती, शाळेची सहल अशा अनेक बातम्या वाचायला मिळाल्या. एखाद्यास्पर्धेत आपणही अशीच कामगिरी करावी म्हणजे माझी ही बातमी पेपरमध्ये येईल हा आत्मविश्वासवाढला खरंच खूप छान. Thanks News Letter.

**भुवी ओंकार तोरसकर**
इयत्ता ४, तुकडी २ ,
पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी

मुलाखत

# "भूतकाळातील चुका सुधारून वर्तमानकाळात स्वत:ला घडवा"


कर्नल संदीप पेंडसे

**शाळेत शिकत असताना तुम्हाला कोणकोणते विषय आवडायचे?**

शाळेत शिकत असताना तसे सर्वच विषय मला आवडायचे. पण विशेष करून मला विज्ञान हा विषय खूप प्रिय होता. त्यामुळेच मी शाळेच्या विज्ञान प्रदर्शनात नेहमी भाग घेत असे. अगदी राज्य पातळीवरील विज्ञान प्रदर्शनातही माझी निवड झाली होती.

**सर या क्षेत्राकडे तुम्ही कसे वळलात? आणि या क्षेत्रासाठी तुम्ही स्वतःला कसे तयार केले?**

लहान असल्यापासूनच मला लष्करी गणवेश खूप आवडायचा. तसेच लष्करी क्षेत्राविषयी मला खूप आकर्षण होतं. लष्कराची परेड बघायला मला खूप आवडायची. तेव्हा मी माझ्या आई-वडिलांना, आजी-आजोबांना सांगे की एक दिवस मी ही या 26 जानेवारीच्या परेडमध्ये तुम्हाला दिसेन. इतकं मला या क्षेत्राबद्दल आकर्षण होतं. माझ्या मनात लहानपणापासून घर करून असलेली देशभक्ती, देशप्रेम यामुळेच मला लष्करात जाण्याची प्रेरणा मिळाली. आपल्या देशाची सेवा करण्याची अनिवार ओढ माझ्या मनात निर्माण झाली. आणि म्हणूनच मी या क्षेत्राकडे वळलो. परांजपे विद्यालय या मराठी माध्यमाच्या शाळेतून मी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर रूपारेल कॉलेजमधून अकरावी व बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. मराठी माध्यमामुळे मला सर्व विषयांचे सखोल ज्ञान मातृभाषेतून अवगत करता आले. तसेच सेमी इंग्रजीमुळे माझ्या पुढील शिक्षणाचा पाया भक्कम होण्यास मदत झाली. रूपारेल कॉलेजमध्ये शिकत असताना मी स्पोकन इंग्लिश सुधारण्यावर भर दिला. अमराठी मित्रांबरोबर बोलून मी स्वतःची इंग्रजी बोलण्याची पद्धत सुधारण्याचा प्रयत्न केला. तसेच टाइम्स ऑफ इंडिया हे वर्तमानपत्र मी दररोज मोठ्याने वाचत असे. त्याने उच्चार सुधारण्यास व इंग्रजीवर प्रभुत्व मिळण्यास फार मोठा फायदा झाला. त्याचबरोबर मी फिजिकल फिटनेसकडेही लक्ष दिले. माझे जनरल नॉलेज वाढवण्यासाठीही तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यानंतर NDA एंट्रन्ससाठी प्रयत्न करून एनडीएत दाखल झालो. सर्विसेस सिलेक्शन बोर्ड ऑफ इंटरव्ह्यूसाठी स्वतःला तयार केले. आणि पुढे त्या त्या संदर्भातील पुढील शिक्षण संपादित करत राहिलो.

**शाळेबद्दलची एखादी आठवण सांगाल का?**

आपली संस्था आणि आपली शाळा महान आहे. ज्यांनी माझ्यासारखे अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी घडवले आहेत. अशा महान संस्थेचा आणि शाळेचा मी माजी विद्यार्थी आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. या शाळेचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. या शाळेने विद्यार्थ्यांचा बहुमुखी विकास घडवण्यासाठी कष्ट घेतले आहेत. माझे व्यक्तिमत्व घडवण्यात माझ्या शाळेचे मोलाचे योगदान आहे. शाळेमुळेच नाटक, खेळ, प्रदर्शने, प्रश्नमंजुषा यासारख्या विविध संधी मला उपलब्ध झाल्या. यातूनच माझ्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

**आपल्याला हे सेवा मेडल कशाबद्दल मिळाले आहे ?**

मी आर्मी हेडक्वॉर्टरमध्ये याआधी तीन वर्षे इंडियन आर्मीचे जे सोल्जर असतात त्यांच्याकरता जनरल स्टोअर्स अँड क्लोदिंग या कॅटेगरीमध्ये जे येतं त्या सगळ्या गोष्टींमध्ये उदा. क्लोदिंग, बुलेटप्रूफ जॅकेट, हेल्मेट, पॅराशूट अशा गोष्टींमध्ये काही सुधारणा घडवल्या. आणि काही प्रोसिजर वेगळ्या इन्स्टिट्यूट केल्या. गेल्या वर्षी लष्कराचा एक कॅमोफ्लाज ड्रेस म्हणजे कॅम्बॅट युनिफॉर्म म्हणतात. तो कॅम्बॅट युनिफॉर्म नवीन लॉंच झाला. त्या कॅम्बॅट युनिफॉर्मसाठी बरीच मेहनत होती. यातील सहभाग आणि महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी मला हे विशिष्ट सेवा मेडल मिळाले आहे.

**आजच्या विद्यार्थ्यांना काय संदेश देऊ इच्छिता?**

आजच्या पिढीला तर विकासाची अनेक क्षेत्रे उपलब्ध आहेत. स्वतःचे ध्येय निश्चित करा आणि ध्येयपूर्तीकरिता अतोनात मेहनत घ्या. वेगवेगळे छंद जोपासा. कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे ते स्वतः ठरवा आणि त्या दिशेने मार्गक्रमण करा. आणि हे करत असताना अपयश आले तरी खचून जाऊ नका. घाबरून स्वतःचे काही बरे वाईट करून घेऊ नका. स्वतःला कधी कमी लेखू नका. दुसऱ्यांबरोबर स्वतःची बरोबरी करू नका. हार्ड वर्क करा. मिळालेल्या संधीचा फायदा घ्या. वेळेचे व्यवस्थापन करा. सोशल मीडियावर जास्त वेळ वाया घालवू नका. त्याऐवजी त्याचा ज्ञान संपादनासाठी वापर करा. भूतकाळाकडून आपल्याला शिकण्यासारखे बरेच काही असते. वर्तमान काळ आपल्याला घडवत असतो. या भूतकाळातील चुका सुधारून वर्तमान काळात स्वतःला घडवले तर भविष्यकाळाची जराही चिंता उरत नाही. मातृभाषेतील संस्कार तर मिळवाच पण मातृभाषेबरोबरच इतर भाषाही डेव्हलप करा. आपल्या ज्ञानाचा फायदा देशाच्या विकासाकरता व संरक्षणाकरिता करा.

**- सतीश अनलि बावधाने**
इयत्ता 9, परांजपे विद्यालय

# होळी खेळताना घ्यायची दक्षता

मित्रांनो, होळीचा सण अनेक रंगांची उधळण करत येतो. सगळेच रंगात चिंब भिजलेले असतात. मात्र बऱ्याचदा रंगांची उधळण करत असताना रंगाचा बेरंग होतो आणि विविध अपघाती घटना घडल्याच्या बातम्या आपण पाहत आणि ऐकत असतो. अशावेळी आपण दक्षता घ्यायला हवी.

- रंगांची उधळण करताना विशेषतः पूर्ण हाताचे शर्ट किंवा टी-शर्ट परिधान करा आणि शक्यतो संपूर्ण शरीरभर कपडे परिधान करा. जेणेकरून रंगांचा थेट त्वचेशी संपर्क येणार नाही.
- होळी हा सण जणू कडक उन्हाळा सुरू झाल्याचे प्रतीक असतो. म्हणूनच रंग खेळण्याच्या नादात डीहायड्रेट होऊ नका. भरपूर पाणी पिऊन शरीरातील तापमान संतुलित ठेवा. पाणी पिताना रंग तोंडात जाणार नाहीत, याची काळजी घ्या.
- होळी खेळायला जाण्यापूर्वी तुमच्या केसांना आणि हाता-पायांना भरपूर खोबरेल तेल किंवा अन्य तेल लावा. यामुळे रंगांमध्ये असणाऱ्या हानिकारक रसायनांपासून हे तेल तुमच्या केसांचा आणि त्वचेचा बचाव करेल. इतकेच नाही तर तुमच्या अंगावरचा रंग काढण्यासाठीही यामुळे मदतच होईल. तेलामुळे रंग त्वचेपासून विलग राहील. तेलामुळे केसांचा पोत रासायनिक रंगांमुळे बिघडणार नाही.
- लहान मुलांचे डोळे अतिशय संवेदनशील असतात. बऱ्याचदा हातात पाणी आणि रंग आले की मुलं वाटेल तशी रंगांची उधळण करतात. काळजी घेऊनही रंग डोळ्यात गेल्यास भरपूर पाण्याच्या



सहाय्याने डोळे धुवावेत. लक्षात ठेवा डोळे चोळू नका. अन्यथा डोळ्यांना आणखी इजा पोहोचू शकते.
- होळीमध्ये शक्यतो नैसर्गिक रंगांचा वापर करा. तुम्ही घरच्या घरी देखील रंग तयार करू शकता. मेहंदी पावडरच्या सहाय्याने तुम्ही हिरवा रंग तयार करू शकता. हळदी पासून पिवळा रंग तयार होतो तर रक्तचंदनापासून लाल रंग तयार होण्यास मदत होते. बीट पासूनही गडद गुलाबी रंग तयार होतो. असे रंग तयार करण्याच्या कार्यशाळाही पर्यावरणप्रेमी आयोजित करत असतात. इंटरनेटवरही या नैसर्गिक रंगांची माहिती मिळते. हे रंग रासायनिक रंगापेक्षा केव्हाही सुरक्षितच असतात. तेव्हा हे रंग धुळवडीला वापरण्यास प्राधान्य द्या आणि इतरांनाही उद्युक्त करा.
- आणखी एक महत्त्वाचं म्हणजे होळी खेळून झाल्यावर तातडीने आंघोळ करून शरीरावरील रंग काढून घ्या. ते अधिक काळ शरीरावर राहणार नाहीत, याची काळजी घ्या आणि आनंदाने होळीचा सण साजरा करा.

## Thank you PTVA !



“ पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या विविध शाळांमध्ये राबविण्यात येणारे उपक्रम, सण, उत्सव, स्पर्धा, पारितोषिक वितरण समारंभ या सर्वांची माहिती सर्व विद्यालयातील विद्यार्थी व पालकांपर्यंत तसेच समाजापर्यंत पोहोचवणे हे या न्यूजलेटरमुळे शक्य झाले आहे. तसेच मुलांमध्ये लेखन कौशल्य, वाचन कौशल्य वाढण्यास या वार्तापत्रामुळे मदत झाली आहे.

**कु. वेदा चंद्रकांत सागवेकर**
इयत्ता – ८ वी
परांजपे विद्यालय माध्यमिक शाळा

# स्पर्धा- कार्यक्रमांतून पार्ले टिळक प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांचा आलेख चढता

**प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम, बालजत्रा आनंद सोहळा, आंतरशालेय धावणे स्पर्धा, जलतरण स्पर्धा, शंकरमठम् संस्कृत श्लोक पठण स्पर्धा अशा विविध स्पर्धा-कार्यक्रमांमध्ये पार्ले टिळक विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपल्यातील कलागुणांचे दर्शन घडवले. त्याचबरोबर पदके आणि चषक मिळवून दिले. सालाबादप्रमाणे पहिली, दुसरीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने ‘रंगतरंग’ चित्रमासिक व तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांनी ‘मुक्तांगण’, स्वानंद ही हस्तलिखित पुस्तिका तयार केली. यादिवशी या पुस्तकांचेही प्रकाशन शाळेच्या मुख्याध्यापिका हर्षदा चव्हाण यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तबद्ध गुच्छकवायत, लेझीम, समूहगीत सादर केले.**

## जलतरण स्पर्धा



प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या जलतरण स्पर्धेत प्राथमिक शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेऊन बक्षिसे व ट्रॉफी मिळवण्याचा बहुमान पटकावला.

## शंकरमठम् संस्कृत श्लोक पठण स्पर्धा



शंकरमठम् या संस्कृत श्लोक पठण स्पर्धेत पहिली-दुसरीच्या विद्यार्थ्यांना षट्पदी स्तोत्र पठण तर तिसरी-चौथीच्या विद्यार्थ्यांना लिंगाष्टकम हे स्तोत्र पठणाला होते. अनेक शाळांचा या स्पर्धेत सहभाग होता. तर पार्ले टिळक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मात्र प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस आणि शाळेला ट्रॉफी मिळवून देऊन शाळेचे नाव उज्ज्वल केले.

## बालजत्रा आनंद सोहळा



६ फेब्रुवारी रोजी पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेत बालजत्रा भरली होती. या बालजत्रेचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष श्री.अनिल गानू यांनी केले तर संस्थेचे कार्यवाह श्री. विनय जोग, संस्थेच्या समन्वयक जान्हवी खांडेकर यांनी बालजत्रेला भेट दिली. प्रोत्साहन देऊन मुलांचा आणि पालकांचा उत्साह वाढवला. बालगोपाळांनी पालकांच्या मदतीने शाळेसाठी लागणाऱ्या वस्तू, गृहोपयोगी वस्तू, खाण्याचे विविध प्रकार या बालजत्रेत विक्रीसाठी ठेवले होते. विद्यार्थ्यांना स्वतः खरेदी-विक्रीचा अनुभव मिळावा, व्यवहारज्ञान कळावे, बाजार कसा चालतो, पैशाचे महत्व समजावे या उद्देशाने शाळेतर्फे हा उपक्रम राबवला जातो. पालकांच्या उत्साही प्रतिसादामुळे आणि शिक्षकांच्या मेहनतीमुळे हा उपक्रम यशस्वी झाल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका हर्षदा चव्हाण यांनी सांगितले.

# मान्यवरांच्या हस्ते प्रजासत्ताक दिन साजरा



बहारदार लेझीमनृत्याचा आविष्कार

पार्ले टिळक विद्यालय असो. चे इंग्रजी माध्यमाचे विद्यालय , अंधेरी आणि परांजपे प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयाने भारताचा ७४ वा प्रजासत्ताकदिन परांजपे शाळेच्या मैदानात उत्साहात साजरा केला.

पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक शाळेत ध्वजप्रणाम करून विद्यार्थ्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या समवेत अखंड प्रजासत्ताक दिनाची प्रतिज्ञा घेतली. तर परांजपे विद्यालयात पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे संचालक धनंजय साठे, समन्वयक जान्हवी खांडेकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

परांजपे विद्यालय प्राथमिक विभागाच्या वरिष्ठ शिक्षिका श्रीम. बर्वे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने नयनरम्य लेझीम प्रात्यक्षिके तसेच डंबेल्स प्रात्यक्षिके सादर केली. या प्रात्यक्षिकांना शाळेचे मुख्याध्यापक श्री. हाक्के व श्री. पुरव यांचे मार्गदर्शन लाभले होते. त्यानंतर समूहनृत्य व समूहगीते सादर करण्यात आली. समुहनृत्याला सान्वी मानकामे व समूहगीतांना भाग्यश्री बर्वे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले होते. खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आंतरशालेय क्रीडास्पर्धांमध्ये पौर्णिमा मोहिते द्वितीय तर स्वरूप शेळके तृतीय

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत आयोजित केलेल्या आंतरशालेय क्रीडास्पर्धांमध्ये परांजपे विद्यालय प्राथमिक शाळेतून इयत्ता चौथीतील पौर्णिमा मोहिते हिने मुलींमधून दुसरा क्रमांक तर स्वरूप शेळके याने मुलांमधून तिसरा क्रमांक पटकावला.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत के पूर्व, के पश्चिम, एच पूर्व, एच पश्चिम या विभागस्तरीय आंतरशालेय क्रीडास्पर्धा शनिवार ११ फेब्रुवारी २०२३ रोजी परांजपे विद्यालय प्राथमिक शाळेच्या पटांगणात संपन्न झाल्या. या स्पर्धांमध्ये एकूण २२ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पहिली आणि दुसरीच्या मुलांसाठी ५० मीटर धावणे, तिसरी आणि चौथीच्या मुलांसाठी १०० मीटर धावणे अशा स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी स्पर्धा समितीच्या सदस्यांनी केलेल्या सहकार्यामुळे स्पर्धा उत्तमरीतीने पार पडण्यास मदत झाली.





# Shivaji Maharaj : Our Pride!




चरितंशिवराजस्यविजयश्रीविराजितम्।
वीराद्भुतरसंपुण्यंरामायणमिवापरम्॥

The biography of Shivaji Maharaj is adorned with great victories, full of valour and wonder, as auspicious as that of Ramayana.

The way Bhima avenged Draupadi's humiliation by Dusshsan, the same way Shivaji Maharaj valiantly vanquished the distress among people.

A perfect example of vision, courage, justice, and love toward his subjects, Shivaji Maharaj founded the Maratha Empire in adverse conditions and built a foundation for a just Hindu nation. He is also called **"जाणताराजा"** which means 'A Cognizant King'. We commemorated the great Maratha King Chhatrapati Shivaji Maharaj on his birth anniversary this month on 19th February with an array of cultural programmes.
(scan QR code for details)

# Sports : key to family bonding - Cop Vinod Patil




"Playing sports together allows families to bond over mutual interests.." said Inspector Shri. Vinod Patil(Andheri Police Station) while addressing the students and parents as the Chief Guest on the Annual Sports Meet at PTVA's English Medium School, Andheri on 4th February 2023. Along with him, Vice-President of PTVA Shri.Vinay Jog graced the event.

The Annual Sports Meet embodies the zeal, talents and spirit of sportsmanship of the students, encouraging them to be persistent and to refine their talents, achieving the best.

The day observed an auspicious beginning by seeking the blessings of Lord Hanuman, followed by the hoisting of the school flag, lighting of the sports torch and declaration of the meet open by the chief guest. A spectacular March Past of the four houses led by the House Commanders was followed by the Oath Taking ceremony with the Sports Teacher Shri. Akshay Dighe pledging to uphold the honour and the spirit of true sportsmanship.

It was a visual treat for the audience as they witnessed breath-taking displays by the budding gymnasts and rope skippers. Thrilling flat running races were followed by fun-filled sack races, obstacle races, lemon n' spoon, and book balancing races. The first set of prizes was given away by the chief guest Shri.

Patil and PTVA VP Jog. The Parents' Game was also quite recharging as the little ones cheered their parents up for participating. Standard wise Sports Champions were announced and felicitated with medals and certificates. Master AaradhyaKanade bagged the shield for the Boys' Champion and Miss Rutvija Salvi and Miss Srushti Khamkar were jointly declared as the Girls' Champions.

# Fun and Frolic at Bhavan's Nature Park





Just education is not enough; children must have sunshine, freedom and playtime!

The most awaited day of the year was the school picnic at Bhavan's Nature Park, Andheri (West) for the students of grades 1 to 3 on 17th January 2023 and for the students of grades 4 to 6 on 18th January 2023.

The students were extremely excited and kept singing songs on the bus till they reached the venue. They were welcomed by the staff of the nature park and served delicious breakfast and were grouped for various exciting and challenging activities like Personality Development Games, Nature Trail, Pet Animal Care, Archery, Cave Tunnel, Vertical Ladder and Zip-lining.

Bhavan's Nature Park gave an experience of being surrounded by greenery and the beauty of nature.

After the fun-packed activity session, they all headed for lunch and relished scrumptious items of food.

Indeed, it was a great day for all the students and teachers, as it strengthened the bond between them.

The children clearly enjoyed their day to the fullest and created beautiful memories to be cherished by them for a long time to come. The picnic was a much-needed break from the regular schedule of the students in school and the children made the best out of it.

Before they boarded their buses back to school, the students expressed a desire to revisit the place.

# Prototyping and 3D Printing Workshop





Std.6 students of PTVA's English Medium School, Andheri participated in the Prototyping and 3D printing workshop conducted by PTVAIM's COEI (Centre of Entrepreneurship & Innovation) on 28th Jan.2023 as a part of PTVA's Startup Expo to facilitate students' innovative thinking and entrepreneurial skills to be showcased to investors, industry experts and the extended community.

The workshop activities were age-appropriate and meticulously planned by COEI team. The resource persons acquainted the students with the concept of Prototyping, the 3D printing process, and its application.

Students also received hands-on experience with the 3D design software TINKERCAD and the setting of a 3D printer. Students made 3D designs of houses, cars, key chains, stars, geometrical shapes, human body cells, amoeba, etc. which were submitted to the COEI team for actual printing. These models will be displayed at the PTVA's Startup Expo scheduled for 4th March 2023 at PTVA's Institute of Management.

-Master Suyog Bhagat (6/A)
PTVA's English Medium School, Andheri